**महाराष्ट्र शासन**

क्र. केमाअ-२००६/प्र.क्र.७/०६/पाच,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २०.६.२००६

प्रति,

सर्व अ.मु.स. / प्र.स. / सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**विषय :- <u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५</u>**
**<u>दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींनी सादर केलेला</u>**
**<u>पुरावा ग्राहय धरण्याबाबत.</u>**

महोदय / महोदया,

माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 7 च्या उप कलम (5) मधील परंतुकानुसार दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींना माहिती मिळण्यासाठी कलम 6 च्या उप कलम (1) तसेच कलम 7 च्या उप कलम (1 ) व (5) नुसार द्यावी लागणारी फी माफ करण्यात आलेली आहे. या सवलतीचा लाभ घेण्याकरीता अर्जदार दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती आहे याबाबतचा पुरावा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. त्यासंदर्भात पुढील प्रमाणे नमुद करण्यात येते :-

२. केंद्र शासनाकडून व राज्य शासनाकडून राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांचा लाभ दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींना मिळवून देण्याकरिता विविध विभागांकडून दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींचे सर्वेक्षण केले जाते.

१. नागरी क्षेत्राशी संबंधीत महानगरपालिका, नगर परिषद, नगरपंचायत यांचेकडून त्यांच्या क्षेत्रात वास्तव्य असलेल्या नागरिकांचे सर्वेक्षण करण्यात येते. त्यानुसार ज्या व्यक्तींचे दरमहा दरडोई उत्पन्न रु. ५९१.७५ पेक्षा कमी आहे अशा व्यक्तींचा दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींच्या यादीमध्ये समावेश करण्यात येतो. अशी कार्यवाही करुन तयार करण्यात आलेली यादी संबंधित महानगरपालिका, नगर परिषद, नगर पंचायत यांच्या कार्यालयात उपलब्ध असते.

२. तसेच ग्रामीण भागात राबविण्यात येणा-या योजनांचा दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींना लाभ देण्याकरिता संबंधित ग्राम पंचायतीकडून अशा कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात येते. या सर्वेक्षणाकरिता राहणीमानाच्या संबंधिच्या १३ बाबी विचारात घेऊन गुणांकन दिले जाते. या गुणांकांच्या आधारे संबंधित ग्राम पंचायतीकडून दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींची यादी तयार करण्यात येते व अशी यादी ग्रामसेवकाकडे उपलब्ध असते.

३. तसेच अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या शासन निर्णय, क्र. साविव्य-१०९९/प्र.क्र.८८८६/ना.पु.२८, दि. ५ नोव्हेंबर, १९९९ व क्र. साविव्य-१००१/प्र.क्र.४८३/ नापु. २८, दि. ८/८/२००१ अन्वये तिहेरी शिधापत्रिका योजना राज्यात राबविण्यात येत आहे. या योजनेनुसार राज्य शासनाने लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत अर्ध्या

किंमतीत धान्याचे लाभ मिळण्याकरिता कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा विहित करण्यात आली आहे.

१) शहरी क्षेत्र -------- रु.१५,०००/-
२) ग्रामिण क्षेत्र (अवर्षण व आदिवासी क्षेत्रासह) ---- रु. १५,०००/-

३. या उत्पन्नाच्या मर्यादेत असलेल्या कुटुंबाकरिता पिवळया रंगाची शिधापत्रिका देण्यास पात्र ठरविण्यात आले आहे व असे कुटुंब सर्वसाधारणपणे दारिद्रय रेषेखालील कुटुंब समजण्यात येते.

४. दारिद्रय रेषेखालील कुटुंब ओळखण्याकरिता उपरोक्त तीन प्रकारे कार्यवाही करण्यात येते. या सर्व वस्तुस्थितीचा विचार करुन सूचित करण्यात येते की, दारिद्रय रेषेखालील ज्या अर्जदार व्यक्तीने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत केलेल्या अर्जासोबत त्याचे वास्तव्य असलेल्या महानगरपालिका / नगर परिषद / नगर पंचायत /ग्राम पंचायत यांचेकडे दारिद्रय रेषेखालील असलेल्या व्यक्तींच्या यादीत त्याचे नांव असल्याचे संबंधितांकडून घेण्यात आलेले प्रमाणपत्र किंवा पिवळया रंगाची शिधा वाटप पत्रिकेची साक्षांकित प्रत जोडणे अनुज्ञेय राहील.

५. तरी यासंबंधातील उपरोक्त सूचना आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या सर्व सार्वजनिक प्राधिकरणांस आपल्या स्तरावरुन तात्काळ देण्यात याव्याव व यासंदर्भात आपल्याकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती या विभागास उपलब्ध करुन द्यावी, ही विनंती.

आपला,

Sd/-
(ज.व. दिवाण)
उप सचिव, महाराष्ट्र

शासन

प्रत,

१) सर्व जिल्हाधिकारी

यांना विनंती करण्यात येते की, सदर पत्रातील परिच्छेद ३ मध्ये नमूद करण्यात आलेल्या सूचना

आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात व यासंदर्भात आपल्याकडून

करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती शासनास उपलब्ध करुन द्यावी, ही विनंती.

२) सचिव, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव.